MHST090001752015

## नि.दि.दा.क्र. ३०/२०१५ मधील निशाणी क्र. १०८ वरील आदेश

प्रतिवादी क्र.३ हिने प्रस्तुतचा अर्ज दुय्यम पुरावा देणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रस्तुत प्रकरणामध्ये मुळ दस्त हा तिने बराच शोधण्याचा प्रयत्न करुन देखील तिला मिळून आला नाही. प्रतिवादी क्र.३ ही पुणे येथे नोकरीस होती व त्या कालावधीत पुणे येथे राहत होती. सेवानिवृत्तीनंतर ती मौजे ल्हासुर्णे, ता. कोरेगाव येथे राहावयास आली. त्यामुळे सामानाची ने आण करताना सदर मुळ दस्त गहाळ झाला आहे अशी तिची खात्री झाली. त्यामुळे तिने दिनांक १७/०७/२०१२ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीपत्राचा दुय्यम पुरावा देणे करीता अर्ज दिला आहे. त्यामुळे, तिने अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

४. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.३ ही हेतु पुर्वक मुळ दस्त दाखल करत नाही. सदरचा अर्ज केवळ कामकाज लांबणीवर पडण्याकरीता दाखल केला आहे. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात

यावा.

५. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, मुळ दस्त हा तिच्याकडून गहाळ झालेला आहे. तिने सदर दस्ताची साक्षांकीत प्रत प्रकरणामध्ये दाखल केलेली आहे. सदर मुळ खरेदीपत्र तिच्या ताब्यात नसल्यामुळे तिला दुय्यम पुरावा देणेची परवानगी देणे योग्य व न्यायोचित राहील. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सदर अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

**<u>आदेश</u>**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.३ हिस दिनांक १७/०७/२०१२ रोजीच्या खरेदीपत्राबाबत दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात येते.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2024.07.31 15:09:34 +0530

स्थळ : कोरेगाव ( ए.ए.पाचरणे )

दिनांक : ३०/०७/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.